महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासं/रवका/न.क्र.०५/
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ६४१ दि. ०५.०८.२०२२

विषय: सरळसेवा भरती / आरक्षण / अनुशेष बाबतचे विवरणपत्र कार्यालयाच्या सूचना फलकावर लावणेबाबत.

संदर्भ: १) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. बीसीसी ११२२/प्र.क्र.१००ए/१६-व दि. ०५.०७.२०२२

शासकीय सेवेतील सरळसेवा भरती / आरक्षण / अनुशेष संदर्भातील आदेशांची योग्य प्रकारे अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र शासन स्तरावर शासन निर्णय / परिपत्रकान्वये सूचना वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या आहेत व त्या तत्कालीन म.रा.वि.मंडळामध्ये व मंडळाचे त्रिभाजन झाल्यानंतर महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीमध्ये अंगीकृत केलेल्या आहेत.

२. आता, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. बीसीसी ११२२/प्र.क्र.१००ए/१६-व दि. ०५.०७.२०२२ अन्वये सरळसेवा भरती / आरक्षण / अनुशेष बाबतचे विवरण पत्र कार्यालयाच्या सुचना फलकावर लावणेबाबतच्या सुचना पारित केलेल्या आहेत. त्यानुसार सक्षम अधिकारी यांनी दि. ०५.०७.२०२२ रोजीच्या शासन परिपत्रकामध्ये पारित केलेल्या सुचना कंपनीमध्ये खालील प्रमाणे अंगीकृत करण्यास मंजुरी प्रदान केलेली आहे.

क) शासन परिपत्रक दि. ०५.०७.२०२२ नुसार पारित केलेल्या सुचनान्वये सर्व नियुक्ती प्राधिकारी / आस्थापना अधिकारी यांना कळविलेले आहे की, सरळसेवा भरतीसाठी दि. ०६.०७.२०२१ (म.रा.वि.वि.कं.मर्या. वर्गीकरण व सेवाप्रवश विनियम - २००५ ला संलग्न दुरूस्ती चिठ्ठी क्र. ९० दि. ०६.०४.२०२२ अन्वये कंपनीमध्ये अंगीकृत करण्यात आलेले आहे) च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या बिंदू नामावलीनुसार प्रत्येक संवर्गातील सरळसेवामधील मंजूर पदे, कार्यरत पदे, रिक्त पदे, अनुशेषाची पदे याबाबतची माहिती शासन परिपत्रक दि. ०५.०७.२०२२ मधील सोबत जोडलेल्या विवरणपत्रानुसार वेळोवेळी अद्ययावत करून कार्यालयाच्या सूचना फलकावर लावण्यात याव्यात.

ख) महावितरण कंपनीतील क्षेत्रीय कार्यालयांमधील सर्व नियुक्ती प्राधिकारी यांनी मंडळ व विभागीय सेवाजेष्ठतेमधील पदांची रिक्त पदे व अनुशेषाची माहिती शासन परिपत्रक दि. ०५.०७.२०२२ मधील विवरणपत्र - १ नुसार कार्यालयाच्या सुचना फलकावर लावावीत.

ग) सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी रिक्त पदे व अनुशेषाची माहिती दर तीन महिन्यांनी अद्ययावत करून नवीन माहिती सर्वांसाठी सुचनाफलक / संकेतस्थळावर प्रसिध्द करावीत.

घ) सर्व नियुक्ती अधिकाऱ्यांनी त्यांच्या संबंधीत पदांच्या रिक्त पदे व अनुशेषाची त्रैमासिक माहिती तीन महिने पुर्ण झाल्यावर ७ दिवसाच्या आत मावक विभागास ई-मेल द्वारे (PDF स्वरूपात व विभाग प्रमुखाची प्रत्येक प्रपत्रावर स्वाक्षरी आवश्यक) कळवावी तसेच मागासवर्गीय कक्ष (मावक) विभागातर्फे सर्व प्रपत्र तपासून सदर माहिती कंपनीच्या संकेतस्थळावर लावण्याची दक्षता घ्यावी.

३. सबब, उपरोक्त सुचनाच्या अंमलबजावणीबाबत उपरोक्त माहिती सूचना फलकावर लावली किंवा कसे, याबाबत वेळोवेळी आढावा घेण्यात येईल व अशी कार्यवाही न करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरूध्द कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी. त्याअनुषंगाने सर्व सक्षम अधिकारी यांना सुचीत करण्यात येत आहे की, उपरोक्त सुचनांची अंमलबजावणी काटेकोरपणे करावी तसेच आपल्या स्तरावर याची दक्षता घेण्यात यावी.

सोबत : शासन परिपत्रक दि. ०५.०७.२०२२.

(अ.म.भादीकर)
कार्यकारी संचालक (मासं)

प्रत सविनय सादर:
संचालक (संचलन)/ (वित्त)/ (वाणिज्य)/ (प्रकल्प)/ (मासं) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

प्रत सस्नेह रवाना:
१) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय औरंगाबाद/ कल्याण.
२) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/ नागपूर.
३) कार्यकारी संचालक (सुवअं)/ (वित्त)/ (महसूल व देयके) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

प्रत रवाना:
१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/ (सांघिक वित्त)/ (अंतर्गत लेखा परिक्षण) / (सांघिक लेखा) / (माहिती तंत्रज्ञान) / मुख्य विधी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या.,नाशिक.
३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई.
४) मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या. परिमंडळ कार्यालय (सर्व)
५) महाव्यवस्थापक (मासं)/ (मासंव्यप्र)/ (नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
६) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/ मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
७) मा. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्यकारी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

**सरळसेवा भरती/ आरक्षण/ अनुशेष बाबतचे विवरणपत्र कार्यालयाच्या सूचना फलकावर लावणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्र. बीसीसी ११२२/प्र.क्र.१०० ए/१६-ब**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ०५ जुलै, २०२२.

वाचा : शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.२००२/प्र.क्र.११/२००२/१६-ब, दि.८.१.२००३.

**परिपत्रक :**

सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व संवर्गातील पदभरतीबाबतचे वार्षिक विवरणपत्र कार्यालयाच्या सूचना फलकावर वेळोवेळी लावण्याबाबतच्या सूचना सामान्य प्रशासन विभाग/ १६-ब यांच्या दि.८.१.२००३ च्या संदर्भीय परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या आहेत. तथापि, सदर विवरणपत्र कार्यालयाच्या सूचना फलकावर लावण्यात येत नसल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आलेली आहे.

२. सर्व नियुक्ती प्राधिकारी/ आस्थापना अधिकारी यांना कळविण्यात येते की, सरळसेवा भरतीसाठी दि.६.७.२०२१ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या बिंदू नामावलीनुसार प्रत्येक संवर्गातील सरळसेवेची मंजूर पदे, कार्यरत पदे, रिक्त पदे, अनुशेषाची पदे तसेच मागणी केलेली पदे याबाबतची माहिती सोबत जोडलेल्या विवरणपत्रानुसार वेळोवेळी सूचना फलकावर लावावी.

३. उपरोक्त सूचना सर्व शासकीय/ निमशासकीय कार्यालये, सेवा मंडळे, महानगर पालिका, नगरपालिका, स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषदा, महामंडळे, शासकीय अनुदान प्राप्त शैक्षणिक संस्था, विद्यापीठे, सहकारी संस्था, शासकीय उपक्रम व शासनाच्या अधिपत्याखालील किंवा शासनाने अनुदान दिलेली मंडळे यांना लागू आहेत.

४. मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना विनंती करण्यात येते की, याबाबतीत त्यांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख/ आस्थापना अधिकारी यांना आवश्यक त्या सूचना द्याव्यात. तसेच, त्यांनी उपरोक्त माहिती सूचना फलकावर लावली किंवा कसे, याबाबतचा वेळोवेळी आढावा घेऊन अशी कार्यवाही न करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करावी.

५. सदरहू शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२२०७०५१५५७४४०००७ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rasik Ambadas Khadse

Digitally signed by Rasik Ambadas Khadse
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=41d02a5c663d2c05d362d4847bea4a1874fda4e9cb60284fb102fd7b9b3891b3, cn=Rasik Ambadas Khadse
Date: 2022.07.07 15:25:23 +05'30'

**( र. अं. खडसे )**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) राज्यपाल यांचे सचिव
२) मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३) उप मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४) सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५) विरोधी पक्ष नेता, विधान परिषद यांचे सचिव
६) विरोधी पक्ष नेता, विधान सभा यांचे सचिव
७) सर्व विधान सभा सदस्य/ विधान परिषद सदस्य
८) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
९) अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
१०) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधान परिषद)
११) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधान सभा)
१२) सर्व विभागीय आयुक्त
१३) सर्व जिल्हाधिकारी
१४) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
१५) प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई
१६) प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई
१७) प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई
१८) प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, नागपूर, औरंगाबाद
१९) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
२०) सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
२१) सचिव, राज्य माहिती आयोग, मुंबई
२२) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
२३) राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक
२४) सर्व महानगरपालिकांचे आयुक्त
२५) सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका
२६) आयुक्त, समाजकल्याण, पुणे
२७) आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक
२८) सर्व मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख
२९) निवड नस्ती, कार्यासन १६-ब.

## विवरणपत्र-१

नियुक्ती अधिकारी/ आस्थापना अधिकारी यांनी त्यांच्या सूचना फलकावर आरक्षणाच्या पदाच्या आढाव्यासंदर्भात लावावयाचे विवरणपत्र

(सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी ११२२/प्र.क्र.१०० ए/१६-ब, दि. ०५ जुलै, २०२२ चे सहपत्र)

विभागाचे / कार्यालयाचे नाव : आढाव्याचा दिनांक :

गट (अ/ ब/ क/ ड) : पदाचे नाव :

| | आरक्षणानुसार आवश्यक पदे (आवश्यक प्रतिनिधित्व) | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती | वि.जा.(अ) | भ.ज.(ब) | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | विशेष मागास प्रवर्ग | इतर मागास वर्ग | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक | अराखीव |
| एकूण मंजूर पदे (सरळसेवेची) | | | | | | | | | | |
| कार्यरत पदे | | | | | | | | | | |
| रिक्त पदे | | | | | | | | | | |
| अनुशेषाची पदे | | | | | | | | | | |
| रिक्त पदे भरण्यासाठी मागणी केलेली पदे | | | | | | | | | | |